वाचले :-

1) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील दिनांक 18 एप्रिल 1995 चे शासन निर्णय
2) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-2018/द प्र.क्र366/16ब, दि.7 मे 2021
3) पदोन्नती समिती सभा दिनांक 16/11/2022 चा सभावृत्तांत
4) मा.आयुक्त सो.- यांचा दिनांक 26 /12/2022 चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिक,
पिंपरी 411018, प्राथमिक शिक्षण विभाग
क्रमांक शिक्षण /आस्था/1अ/कावि/608-/2022
दिनांक 26/12/2022

**विषय :- सहाय्यक प्रशासन अधिकारी पदावर पदोन्नतीबाबत..**

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर "सहाय्यक प्रशासन अधिकारी " अभिनामाची रिक्त पद पदोन्नतीने भरण्याकरिता दिनांक 16/11/2022 रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आलेली होती. उपरोक्त वाचले क्रमांक 1 चे शासन निर्णयानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर रिक्त असलेले सहाय्यक प्रशासन अधिकारी संवर्गाचे एक पद शिक्षण मंडळाकडे वर्ग करण्यास मान्यता दिलेली आहे. सदर पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता, पदोन्नतीपूर्व पदावरील पर्यवेक्षक संवर्गाची सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, तसेच मत्ता व दायित्वाची माहिती , संगणक अर्हता इत्यादी बाबी विचारात घेऊन खालील तपशिलात नमूद केलेल्या पर्यवेक्षक कर्मचारी यांना "सहाय्यक प्रशासन अधिकारी" या पदावर पे.लेवल- एस-15 वेतनश्रेणी- र.रु. 41800-132300 मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यास शिफारस केली आहे.

| अ. क्र. | संगणक क्रमांक | कर्मचारी नाव | सध्याचे पद | प्रवर्ग | पदस्थापना |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 11686 | रजिया नियाज खान | पर्यवेक्षक | ज्येष्ठतेनुसार | प्राथमिक शिक्षण विभाग |

सबब, वरील सर्वबाबी विचारात घेता, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे-18, पदोन्नती मधील आरक्षण रद्द करण्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 मध्ये होणारा अंतिम निर्णय व शासन निर्णय दिनांक 07/05/2021 चे अधिन तसेच सदर पदोन्नती मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबीत असलेल्या रिट पिटीशन (स्टँम्प) क्र.10876/2021,रिट पिटीशन (स्टँम्प) क्र.10878/2021,तसेच रिट पिटीशन (स्टँम्प) क्र. 10909/2021 मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून उपरोक्त नमुद कर्मचारी यांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार "सहाय्यक प्रशासन अधिकारी" पदावर पे-लेवल एस-15 वेतनश्रेणी र.रु. 41800-132300 या मध्ये पदोन्नती देणेस मान्यता देत आहे. त्यांनी सहाय्यक प्रशासन अधिकारी पदास प्रदान केलेले सर्व अधिकार वापरुन प्रभावीपणे कामकाज करावे. श्रीम.रजिया नियाज खान यांना प्रस्तुत आदेशान्वये सहाय्यक प्रशासन अधिकारी पदावर पदोन्नती देणेत येत असल्याने त्यांना आदेश क्रमांक

शिक्षण/प्रशा/2/कावि/622/2022 दिनांक 02/06/2022 अन्वये देणेतआलेला सहाय्यक प्रशासन अधिकारी या पदाचा अतिरिक्त पदभार निरस्त करणेस येत आहे. प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – 411018.

प्रति,
संबंधित कर्मचारी

प्रत- 1) बिट लिपिक प्राथमिक शिक्षण विभाग 2) संबंधित शाळा प्राथमिक शाळा मनपा 3) सेवाजेष्ठता टेबल-1 शिक्षण विभाग4) लेखा विभाग 5) पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ 5) संबंधित सर्व विभाग